सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा या संवर्गात कार्यरत असलेल्या नियमित वैद्यकीय अधिका-यांना सेवांतर्गत पदव्युत्तर शिक्षणासाठी पाठविण्याच्या अनुषंगाने दुर्गम / अतिदुर्गम भागातील आरोग्य संस्थांचे वर्गीकरण करणेसाठी समिती गठीत करणेबाबत

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय क्रमांकः मवैअ-२०१७/प्र.क्र.४७३/१७/सेवा-३

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
१० वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: २४ नोव्हेबर,२०१७

**वाचा -**

१) **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः मवैअ-१०१०/३९०/प्र.क्र.३६६/सेवा-३, दि.१९.०६.२०१०**

२) **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः मवैअ-१९१०/४६६/प्र.क्र.४११/१०/ सेवा-३, दि.०३.०५.२०११**

**प्रस्तावना -**

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा या संवर्गात कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांना ठराविक कालावधीसाठी आदिवासी, दुर्गम भागात सेवा दिल्यानंतर राज्य शासनामार्फत पदव्युत्तर पदवी आणि पदविका शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येते. आतापर्यंत प्रचलित नियमांनुसार पदव्युत्तर पदवी / पदविका साठी संधी उपलब्ध करुन देताना वैद्यकीय अधिका-यांना त्यांच्या आदिवासी , दुर्गम भागातील सेवेनुसार प्रत्येक वर्षी १० टक्के अतिरिक्त गुण व जास्तीत जास्त ३ वर्षे सेवा केल्यावर ३० टक्के अतिरिक्त गुण देण्यात येतात. तथापि, भारत वैद्यक परिषदेने MCI (Medical Council of India) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेचे नियम सुधारीत केले आहेत, ज्यामध्ये उमेदवाराला दुर्गम / अतिदुर्गम भागात सेवा केल्याबाबत अतिरिक्त गुण मिळतील व संबंधित राज्य शासनास त्यांच्या अखत्यारितील अशा आरोग्य संस्थांचे वर्गीकरण करण्याची मुभा देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने आरोग्य संस्थांचे - अतिदुर्गम, दुर्गम, डोंगराळ व इतर ग्रामीण भाग असे वर्गीकरण करण्यासाठी व उमेदवारांना त्या त्या भागातील आरोग्य संस्थेमध्ये केलेल्या सेवेच्या अनुषंगाने पदव्युत्तर शिक्षणासाठी अतिरिक्त गुण देण्यासाठी समिती गठीत करणे आवश्यक आहे.

## शासन निर्णय-

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा या संवर्गात कार्यरत नियमित वैद्यकीय अधिका्-यांना सेवांतर्गत पदव्युत्तर पदवी / पदविका शिक्षणासाठी भारतीय वैद्यक परिषद (MCI) च्या वैद्यकीय पदव्युत्तर शिक्षण नियमावली २००० च्या नियम ९ (१) (ब) नुसार राज्यातील दुर्गम / अतिदुर्गम भागातील आरोग्य संस्थांचे वर्गीकरण करण्यासाठी पुढील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे -

| | | |
|---|---|---|
| १ | डॉ. प्रकाश पी. डोके, माजी/ सेवानिवृत्त संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य | **अध्यक्ष** |
| २ | संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य | **सदस्य** |
| ३ | उप सचिव, सेवा ३, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई | **सदस्य** |
| ४ | डॉ. बी. एन. हिवाळे, विशेष कार्य अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग, मुंबई | **सदस्य** |
| ५ | सह संचालक ( तां), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | **सदस्य** |
| ६ | सह संचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर) मुंबई | **सदस्य** |
| ७ | सह संचालक / उपसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई | **सदस्य** |
| ८ | सह आयुक्त / उप आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | **सदस्य** |
| ९ | श्री शैलश पाटणकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा, मुंबई | **सदस्य सचिव** |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201711241034580717 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2017.11.24 15:11:16 +05'30'

**(व.मुं.भरोसे)**
उप सचिव, महारष्ट्र शासन

प्रत,

१) डॉ. प्रकाश पी. डोके, माजी/ सेवानिवृत्त संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य

२) आयुक्त आरोग्य सेवा, मुंबई.

३) संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य

४) उप सचिव, सेवा ३, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

५) डॉ. बी. एन. हिवाळे विशेष कार्य अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग, मुंबई

६) सह संचालक (तां), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

७) सह संचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये मुंबई (रस्तराज्य)

८) सह संचालक / उपसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

९) सह आयुक्त / उप आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

१०) श्री. शैलेश पाटणकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा, मुंबई

११) निवडनस्ती (सेवा-३)